# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## एशियन हॉस्पिटमध्ये एनआयसीयु विभागात आग; सर्व सुरक्षित

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवारी एका खाजगी रुग्णालयाच्या एनआयसीयु (नियोनेटल इंटेंसिव्ह केअर युनिट) मध्ये आग लागली. घटनेच्या वेळी वॉर्डमध्ये ९ नवजात बाळं दाखल होती. रुग्णालय प्रशासनाने सर्व मुलांना सुरक्षित बाहेर काढून दुसऱ्या रुग्णालयात हलवले.

ही घटना शहरातील जालना रोड परिसरात असलेल्या एशियन रुग्णालयात घडली. रुग्णालय चालवणारे डॉ. शोएब हाश्मी यांच्या मते, कर्मचाऱ्यांनी एसी युनिटमधून धूर निघताना पाहिला. यानंतर रुग्णालयाच्या पथकाने तातडीने दाखल असलेल्या सर्व ९ नवजात बाळांना बाहेर काढले. सर्व नवजात बाळं सुरक्षित आहेत.

डॉक्टरांनी सांगितले की, नवजात बालकांना त्यांच्या कुटुंबीयांच्या संमतीने दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले. रुग्णालयाच्या पथकाने आगीवर तात्काळ नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणीही जखमी झाल्याची माहिती नाही. रुग्णालयाची स्वच्छता करण्यात आली असून आता तेथे सामान्यपणे कामकाज सुरू आहे.


(वर्ष ६५ वे अंक २२४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०५ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# महाराष्ट्राचे केंद्राकडे ३ हजार कोटी अडकले!

## महायुतीतील मंत्री भरत गोगावलेंचे पंढरपुरात वक्तव्य

पंढरपूर दि.४ (प्रतिनिधी)- शिवसेनेचे नेते आणि मंत्री भरत गोगावले यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. केंद्र सरकारकडे रोजगार हमी योजनेच्या बिलाचे राज्याचे ३ हजार कोटी रुपये अडकल्याचे वक्तव्य गोगावले यांनी केलं आहे. ते पैसे आले की ठेकेदारांचे पैसे देणार असल्याचेही ते म्हणाले. रोजगार हमी योजनेतील अनेक ठेकेदारांची बिल रखडली आहेत. याबाबत गोगावले यांना विचारले असता ते बोलत होते. आज गोगावले पंढरपूरच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

रोजगार हमी योजनेतील अनेक ठेकेदारांची बिले रखडली असून केंद्राकडे सरकारचे ३००० कोटी रुपये अडकले आहेत असे वक्तव्य मंत्री भरत गोगावले यांनी केले. ते पैसे



आल्यानंतर गेल्या तीन-चार वर्षांपासून थकलेली ही बिले दिली जातील असे भरत गोगावले म्हणाले. यामध्ये केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडून महाराष्ट्राला ३ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. ही रक्कम केंद्राकडे आहे. याबाबत शिवराज सिंह चव्हाण यांना जास्तीत जास्त रकमेची मागणी केली असून ते पैसे आल्यावर थकीत बिले दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शरद पवारांनी पूर्वीच्या काळात मराठा आरक्षण प्रश्न निर्णय घ्यायला हवे होते, या विखे पाटील यांच्या विधानाबाबत गोगावले यांनी सावध प्रतिक्रिया दिली. जुन्या काळात अटी शर्ती फारशा नव्हत्या. त्यावेळी निर्णय घेतला असता, तर यांचा फायदा समाजाला झाला असता, असे विखे पाटील यांना वाटले असेल. तर पवारांनी करायला हवे होते, अशी प्रतिक्रिया राज्याचे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी दिली आहे.

वैयक्तिक विचाराला औषध नसते मात्र कितीही टीका झाली तरी शिंदे साहेब संयमी आहेत अशी स्पष्ट प्रतिक्रिया आज भरत शेठ गोगावले यांनी मराठा आंदोलन मनोज जरांगे यांच्याकडून होत असलेल्या टीकेबाबत केली. मनोज जरांगे यांनी दिलेल्या ११ सप्टेंबरच्या अल्टिमेटम बाबत बोलताना मराठा समाजाला आरक्षण देताना इतर कोणाला अडचण होणार नाही याचा विचार करावा लागतो आणि सर्व बाबींचा अभ्यास करून पुढे जावे लागते. मात्र राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री हे मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सकारात्मक असल्याचे गोगावले यांनी सांगितले. राज्यात डॉल्बी बंदी बाबत सुरू असलेल्या वादावर बोलताना शासनाने याबाबत योग्य निर्णय घेतला असून इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे कमी आवाजात लावले तर इतरांना त्रास होत नाही पण पारंपारिक वाद्याचा वापर करणे योग्य असल्याचे गोगावले यांनी सांगितले.

## महायुतीच्या नेत्यांनी लक्षात घ्यावे, सरकार आणण्यात ओबीसींचा महत्त्वाचा हातभार

### छगन भुजबळांचा घरचा आहेर; थेट रस्त्यावर उतरण्याचा इशारा

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस असून, त्यांनी सरकारला ११ तारखेपर्यंत सर्व मागण्या मान्य करण्याचा अल्टिमेटम दिला आहे. काल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री उदय सामंत आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाने जरांगेंची भेट घेतली; मात्र अडीच तासांच्या चर्चेनंतरही तोडगा निघाला नाही. या सर्व घडामोडींवर आता राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेत महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, जात पडताळणी समिती ही महत्त्वाची समिती आहे. त्याच्यावर कुणीही दबाव आणता कामा नये. काही प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने नाकारली आहेत. ती दुरुस्त करून देतो, असं काही आमदार म्हणाले आहेत. आता माझा त्या आमदारांना सवाल आहे की, मुंबईत ४ नगरसेवकांचं जात पडळणीत प्रमाणपत्र रद्द ठरलं आहे. त्यामुळे त्यांचं नगरसेवक पद गेलं आहे. आता ते देखील तुम्ही दुरुस्त करून देणार आहात का? असे म्हणत त्यांनी प्रसाद लाड यांना टोला लगावला.

मराठा समाजाकडून कुणबी प्रमाणपत्र घेताना दाखल्यावर खडाखोडी करण्यात आल्या आहे. आता ते दाखले तुम्ही स्वीकारणार आहात का? जात पडताळणी समितीवर कुणीही दबाव आणू नये. राज्यातील महायुतीच्या नेत्यांनी लक्षात घ्यावे ओबीसींनी तुम्हाला मदत केली आहे. तुमचं सरकार आणण्यात ओबीसींचा महत्त्वाचा हातभार आहे, असे म्हणत छगन भुजबळ यांनी सरकारला घरचा आहेर दिला.

छगन भुजबळ पुढे म्हणाले की, आता मराठा कुणबी मंत्रालय करायचं सुरू आहे? आता हे कसं काय होईल? करायचं असेल तर प्रत्येक जातीसाठी करा. आमचा दाखल्याला विरोध नाही. मात्र, ओबीसी आरक्षण संपता कामा नये. सरकारने स्पष्टता आणायला हवी. कधी ओबीसी आरक्षण घेत आहे. कधी एसईबीसी आरक्षण घेत आहेत, तर कधी आरक्षण घेत आहेत. आमचे सतत मंत्री जातात लाड पुरवायला. आमचे एक नेते गेलेच होते लाड पुरवायला. एक व्यक्ती मुख्यमंत्र्यांबाबत बोलला तर ताबडतोब पोलीस जाऊन पकडतात आणि इथे तर सतत खालची भाषा बोलली जात आहे, असे म्हणत त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला.

## एनसीएमसी कार्ड सक्तीचा गोंधळ थांबवा!, तात्काळ सक्ती रद्द करा; जयंत पाटलांची मागणी

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- एनसीएमसी कार्ड सक्तीचा गोंधळ थांबवा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी केले आहे. ऐन गणेशोत्सवाच्या काळत एसटी महामंडळाने महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्ड सक्तीचे केल्याने राज्यभर प्रवाशांचे हाल होत असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे.

जयंत पाटील यांनी ट्विट करत म्हटले की, २०२४ साली विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत म्हणून महायुती सरकारने महिलांना एसटी बसमध्ये मोफत प्रवासाची घोषणा केली. आता ऐन गणेशोत्सवात एसटी महामंडळाने महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी कार्ड सक्तीचे केल्याने राज्यभर प्रवाशांचे हाल होत आहेत.

पुढे जयंत पाटील म्हणाले, कुठे सर्व्हर डाऊन, कुठे कार्डांचा तुटवडा तर कुठे रिचार्जच्या तांत्रिक अडचणींमुळे अनेकांना हक्काची सवलत न मिळता पूर्ण तिकीटाचे पैसे मोजावे लागत आहेत. पण महिलांना सवलत देताना कार्डाची सक्ती कशासाठी? हाच मूळात प्रश्न आहे. लाभार्थी महिला प्रत्यक्ष बसमध्ये उपस्थित असतानाही तिची सवलत कागदी-तांत्रिक अटींमध्ये अडकवणे, हे पूर्णपणे विसंगत असल्याची टीका त्यांनी केली आहे.

मूळात सरकारची कल्पना हास्यास्पद आहे. शासनाने ही जाचक कार्ड सक्ती तात्काळ रद्द करून महिला, ज्येष्ठ नागरिक व इतर लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच सवलतीचा लाभ द्यावा, अशी मागणी करणारे पत्र देखील जयंत पाटील यांनी परिवहन मंत्री आणि मुख्य सचिवांना दिले असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

## ५८ लाख नोदींचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय थांबणार नाही!

### जरांगेंचा सरकारला ११ सप्टेंबरपर्यंत अल्टिमेटम!

जालना दि.४ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या हक्काच्या मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी (दि. ४) उपोषणाच्या सातव्या दिवशी राज्य सरकारला थेट व आक्रमक अल्टिमेटम दिला. ''हैदराबाद गॅझेटनुसार ५८ लाख कुणबी नोंदींचे प्रमाणपत्र वाटप केल्याचे राज्य सरकारने तात्काळ अधिकृतरीत्या जाहीर करावे; हे प्रमाणपत्र हातात घेतल्याशिवाय मी कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही,'' असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. यासाठी त्यांनी सरकारला ११ सप्टेंबरपर्यंतची अंतिम मुदत (डेडलाइन) दिली असून, १२ सप्टेंबर रोजी मराठा समाजाची निर्णायक बैठक बोलावल्याचे जाहीर केले.

पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, ११ सप्टेंबरपर्यंत सरकारने निर्णय घेतला नाही, तर १२ सप्टेंबर रोजी मराठा समाजाची राज्यस्तरीय बैठक अंतरवाली सराटीत पार पडेल. या बैठकीत मुंबईला कूच करण्याची अंतिम तारीख निश्चित केली जाईल. ''एकदा का मुंबईची तारीख ठरली, की मग सत्ताधाऱ्यांच्या हातात कोणतेही अधिकार राहणार नाहीत, हे मी १०० टक्के सांगतो,'' असा थेट इशारा त्यांनी महायुती सरकारला दिला. तसेच सातारा, कोल्हापूर आणि औंध संस्थानांचे गॅझेटही लागू करून घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपोषणादरम्यान सुरू असलेल्या वैद्यकीय उपचारांविषयी बोलताना जरांगे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. ''दोन-चार सलाईन लावल्या म्हणून मला आता बोलता येत आहे. डॉक्टरांनी विनंती केली म्हणून सलाईन घेतली. मात्र मी अजून केवळ दोन ते तीन दिवस वाट पाहणार. त्यानंतर हातातील सलाईन काढून टाकणार, पाणीही बंद करणार आणि सर्व उपचार थांबवणार. सरकारने आता कोणत्याही गैरसमजात राहू नये,'' असा इशारा देत त्यांनी आंदोलनाची धार तीव्र करण्याचे संकेत दिले.

ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या विधानांचा समाचार घेताना जरांगे पाटील यांनी जोरदार हल्ला चढवला. ''म्हातारा झाला म्हणजे शहाणपण आले असेल असे वाटले होते; मात्र म्हातारपणातही त्यांची भूमिका बदलत नाही. तुला स्वतःची राजकीय पोळी भाजायची असेल तर लाँग मार्च काढ, तंगड्या वर करून योगा कर. मराठ्यांना दिलेले १० टक्के आरक्षण हे ५५ टक्के समाजाला कसे पुरणार? त्यामुळे आम्हाला संपूर्ण ओबीसी प्रवर्गातूनच हक्काचे आरक्षण हवे आहे,'' असे ते म्हणाले. मराठ्यांच्या मागण्या डावलल्यास आगामी काळात समाज महायुतीपासून पूर्णपणे दूर जाईल, असा राजकीय इशाराही त्यांनी दिला.

## एकनाथ शिंदेंवर बोलणे आता सहन केले जाणार नाही

### संजय लाखे पाटलांचा मनोज जरांगेंना इशारा

जालना दि.४ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर बोलणे आता यापुढे खपवून घेतले जाणार नाही,' असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक शिवसेना प्रवक्ते संजय लाखे पाटील यांनी दिला आहे. जालना येथे आयोजित पत्रकार परिषदेत लाखे पाटील यांनी जरांगे यांच्या भूमिकेवर जोरदार हल्लाबोल केला, तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही आरोप केले. संजय लाखे पाटील म्हणाले, सामाजिक चळवळीला काही मर्यादा असतात. मात्र त्या मर्यादा ओलांडून केवळ एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले जात आहे. 'शिंदेंना बदनाम करण्यामागे राजकीय अजेंडा आहे. सामाजिक आंदोलनाच्या आडून एखाद्या नेत्याला व्यक्तिगत टार्गेट करणे चुकीचे आहे. एकनाथ शिंदे यांच्याविषयी कृतज्ञता बाळगली नाही, तर तो कसला मराठा?' असा सवाल त्यांनी केला. शिंदे यांच्या प्रयत्नांमुळेच मराठा समाजातील साडेतीन लाख नागरिकांना प्रमाणपत्रे मिळाली असून, त्यांचे योगदान नाकारता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय जरांगे यांची हैदराबाद गॅझेटबाबतची मागणी चुकीची असल्याचा दावाही त्यांनी केला. मनोज जरांगे यांच्यावर निशाणा साधतानाच संजय लाखे पाटील यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही टीका केली. मराठा आरक्षणाच्या संदर्भात प्रशासनाकडून सुरू असलेल्या प्रक्रियेवर आक्षेप घेत, 'मंत्री विखे पाटील हे संपूर्ण मराठा समाजाला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत,' असा आरोप त्यांनी केला.

## जिवंत राहिलो तर रविवारी मोर्चात नक्की सहभागी होणार!

### विद्यानंद बापट यांची पत्रकार परिषदेत माहिती

पुणे दि.४ (प्रतिनिधी)- टिळक रस्त्यावर झालेल्या मारहाणीच्या घटनेनंतर अवघ्या २४ तासांत सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी पत्रकार परिषद घेत आपली आक्रमक आणि रोखठोक भूमिका पुन्हा एकदा मांडली. ''माझ्यावर झालेला भ्याड हल्ला ही वैचारिक दिवाळखोरी आहे. नरेंद्र दाभोलकरांसारख्या विचारवंतांचा सकाळी मॉर्निंग वॉकला गेल्यावर खून झाला होता, त्यामुळे पुढे काय होईल हे सांगता येत नाही; पण जर मी जिवंत राहिलो आणि जाण्याजोग्या परिस्थितीत असेन, तर रविवारी पुण्यात निघणाऱ्या मोर्चात नक्की सहभागी होईन,'' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या पोलीस संरक्षणाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले, मात्र पोलिसांनी दिलेल्या सूचनेनुसार उघड्यावर पत्रकार परिषद न घेता बंदिस्त जागेत माध्यमांशी संवाद साधला.

बापट हे मूळचे पुणेकर नसल्याच्या टीकेला उत्तर देताना ते म्हणाले, ''मी कुठला आहे किंवा कोण आहे, हा मुद्दाच नाही. जेव्हा समोरच्या व्यक्तीला मूळ विषयाचा तार्किक प्रतिवाद करता येत नाही, तेव्हा तो अशा पळवाटा शोधतो. यालाच तर्कामध्ये ॲड हॉमिनेम फॅलसी म्हणतात.''

''सार्वजनिक ठिकाणी उत्सव साजरा करताना कर्णकर्कश ध्वनिप्रदूषण आणि वाहतुकीची कोंडी नागरिकांवर लादली जाते. हा सर्वसामान्य पुणेकरांना होणारा थेट उपद्रव आहे आणि त्यावर बोलण्याचा प्रत्येक करदात्या नागरिकाला घटनादत्त अधिकार आहे.''

डीजे व्यवसायावर हजारो लोकांचा रोजगार अवलंबून असल्याच्या दाव्याचा बापट यांनी अत्यंत कठोर शब्दांत समाचार घेतला. ''मुंबईत ९२-९३च्या काळात अंडरवर्ल्ड टोळ्या (पान ४ वर)

## मराठवाड्यात दुष्काळाचे सावट अधिक गडद; स्वतंत्र पॅकेज जाहीर करण्याची मागणी

बीड दि.४ (प्रतिनिधी)- सध्या राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. कारण शेतकऱ्यांची उभी पिकं पाण्यावाचून करपू लागली आहेत. पावसाळा सुरु होऊन तीन महिन्याचा कालावधी लोटला तरीदेखील चांगला पाऊस पडला नाही. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. अशीच परिस्थिती बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात देखील आहे. पाऊस नसल्यामुळं उभ्या पिकात जनावरे सोडण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. दुष्काळाचे सावट गडद होताना दिसत आहे.

बीड जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी हतबल झाले आहे. चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. आष्टी तालुक्यात काही शेतकऱ्यांनी उभ्या पिकातच जनावरे सोडल्याचे चित्र आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. उभी पिके वाया गेल्याने आणि जनावरांसाठी चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने काही शेतकऱ्यांनी उभ्या पिकातच आपली जनावरे सोडली आहेत. यावेळी एका हताश महिला शेतकऱ्याने जनावरांना चारा आणि पाणी कसे द्यायचे, असा (पान ४ वर)

## पुण्यात ५१ वर्षीय नराधमाचा २ वर्षाच्या चिमुकलीसोबत लैंगिक अत्याचार

मावळ दि.४ (प्रतिनिधी)- वडगाव मावळातील टाकवे बुद्रुक येथे अवघ्या २ वर्षे १० महिन्यांच्या चिमुकलीसोबत लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी ५१ वर्षीय नराधम बाळू नामदेव आसवले याला वडगाव मावळ पोलिसांनी अटक केली आहे. एका दूध डेअरीत ही घटना घडल्याचा आरोप पीडित मुलीच्या आईने केला आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अटकेतील आरोपीला वडगाव न्यायालयाने ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, पुढील तपास वडगाव मावळ पोलीस करत आहेत.

तर या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने चिमुरडीला आईस्क्रीम खाण्याचं आमिष दाखवून दोन वर्षे १० महिन्यांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मावळ तालुक्यातील टाकवे बुद्रुक येथे मंगळवारी (दि. १ सप्टेंबर) सकाळी ११ ते दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. याप्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी ५१ वर्षीय संशयिताला अटक केली असून वडगाव मावळ येथील न्यायालयाने त्याला मंगळवारपर्यंत (दि. ८ सप्टेंबर) पोलिस कोठडी सुनावली आहे. बाळू नामदेव असवले (वय ५१, रा. टाकवे बुद्रुक, ता. मावळ) असे पोलिस कोठडी सुनावण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. पीडित चिमुकलीच्या आईने याप्रकरणी गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) वडगाव मावळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. वडगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयिताने चिमुकलीला दुकानातून आईस्क्रीम देण्याचं आमिष दाखवलं. त्यानंतर दुकानात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. हा प्रकार चिमुकलीने तिच्या आईला सांगितला. त्यानंतर आईने पोलिसांकडे तक्रार केली. या घटनेचा तपास पोलिस करत आहेत. पीडित चिमुकलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून वडगाव मावळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी नराधम आरोपीला तात्काळ गजाआड केले आहे. या घटनेमुळे मावळ परिसरात नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात असून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## नेपाळमधील बोगद्यात अडकलेल्या २ जणांची ९ दिवसांनी सुटका

काठमांडू दि.४ (वृत्तसंस्था)- नेपाळमध्ये आलेल्या महाप्रलयात आतापर्यंत शेकडो जणांचा बळी गेला आहे, तर २ हजार पेक्षा जास्त लोक अद्यापही बेपत्ता आहेत. बेपत्ता लोकांचा अजूनही शोध घेतला जात आहे. या महापुरामुळे अनेक गावं भुईसपाट झाले असून या पुरात अनेक इमारती, पूल कोसळले आहेत. पुराबरोबर आलेल्या माती आणि दगड-धोंड्यांमुळे मोठा विध्वंस झाल्याचं पाहायला मिळत आहे.

नेपाळमधील या पुराच्या घटनेत त्रिशुली-३ 'ए' जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात अनेक कामगार अडल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्या अनुषंगाने त्रिशुली-३ 'ए' प्रकल्पाच्या बोगद्यात बेपत्ता कामगारांचा शोध घेतला जात होता. यासाठी नेपाळच्या सैन्यांकडून रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात येत होतं. या रेस्क्यू ऑपरेशनच्या दरम्यान तब्बल ९ दिवसांपासून बोगद्यात अडकलेल्या २ जणांची सुखरूप सुटका करण्यात यश आलं आहे. या 'रेस्क्यू ऑपरेशन'चा थरारक व्हिडीओ समोर आला आहे. ९ दिवसांपासून बोगद्यात अडकलेल्या कामगाराने सुखरूप बाहेर आल्यानंतर त्यांच्या कठीण प्रसंगाचा थरारक अनुभव सांगताना एक महत्वाचं वक्तव्य केलं आहे. 'आपण सतत हरे कृष्णाचा जप करत होतो, त्यामुळे मला जगण्याचं बळ मिळालं', असं म्हणत या कामगाराने आपल्याला दुसरं आयुष्य मिळाल्याची भावूक प्रतिक्रिया दिली.

## भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवली तरी युद्ध थांबणार नाही-परराष्ट्र मंत्री

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- अमेरिका व इराण यांच्यातील युद्ध, त्यापाठोपाठ डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगभरातल्या देशांवर लादलेले टॅरिफ, त्यावर झालेल्या आंतरराष्ट्रीय चर्चा आणि त्यानंतर भारतानं रशियाकडून तेलखरेदी बंद करावी यासाठी अमेरिकेचा दबाव, या मुद्द्यांवर गेल्या काही महिन्यांत मोठी चर्चा पाहायला मिळाली. भारतानं रशियाकडून तेलखरेदी थांबवली, तर रशिया व युक्रेन यांच्यात चालू असलेलं युद्ध थांबेल किंवा रशियाला मिळणारी रसद खंडित होईल,



असा दावा अमेरिकादी देशांकडून करण्यात आला. मात्र, आता भारताकडून यासंदर्भात ठाम भूमिका मांडण्यात आली असून भारतानं रशियाकडून तेलखरेदी थांबवली, तरी रशिया व युक्रेनमध्ये चालू असलेलं युद्ध थांबणार नसल्याचं भारतानं सांगितलं आहे.

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना युद्ध संपवण्याचं आवाहन केलेलं असतानाच दुसरीकडे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे द्विपक्षीय चर्चांसाठी क्यीव येथे दाखल झाले आहेत. गुरुवारी या चर्चेवेळी एस. जयशंकर यांनी भारतानं रशियाकडून तेल खरेदी करण्याबाबत भूमिका स्पष्ट केली. क्यीव येथे जयशंकर यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांची भेट घेतली. यानंतर ते बोलत होते.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी यावेळी रशियाकडून तेलखरेदी (पान ४ वर)

## स्वतंत्र भारद्वाज पोलिसांच्या ताब्यात

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान एका विद्यार्थ्याच्या वडिलांवर हल्ला करणारा स्वतंत्र भारद्वाज याला दिल्लीपोलिसांनी उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथून ताब्यात घेतले आहे. भारद्वाज याच्या अटकेच्या मागणीसाठी सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याला घेराव घातला होता. यानंतर, पोलिसांनी स्वतंत्र भारद्वाज याला ७२ तासांच्या आत अटक करणार असल्याचे सांगितले होते. दरम्यान, आता दिल्ली पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

## नावाचा दुरुपयोग करणाऱ्यांचा समाचार घेऊ-उद्धव ठाकरे

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- गेल्या काही महिन्यांपासून शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद केला आहे. आता शिवसेना शिंदे गटाकडून मुकुल रोहतगी हे युक्तीवाद करत आहेत. त्यामुळे लवकरच शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतचा निर्णय लागण्याची शक्यता आहे.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना आज (४ ऑगस्ट) उद्धव ठाकरे यांनी एक महत्वाचं वक्तव्य केलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी आज बीड जिल्ह्यातील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे २५० कार्यकर्ते (बीएलए) मुंबईत आले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत पक्ष संघटनेच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी महत्वाचं भाष्य करत 'नावाचा दुरुपयोग करणारे बरेचजण आहेत. पण आपण आता त्यांचा समाचार घेत असून लवकर त्याचा निकाल लागेल', असं म्हटलं आहे.

''सध्या नावाचा दुरुपयोग करणारे (पान ४ वर)

# पालक व शिक्षकात समन्वय व सुसंवाद हवा

आजचा विद्यार्थी हा कमालीचा अस्वस्थ व निरागस निराश झाल्यासारखा वाटत आहे. अभ्यासाविषयी आवड नाही, शाळा कॉलेजविषयी आस्था नाही. समाजाविषयी व सामाजिक संबंधाविषयी आपुलकी व मान मर्यादाची भावना झपाट्याने लोप पावत आहे. यामुळे आजचा विद्यार्थी भविष्यात बेशिस्त, तर होणार नाही ना? अशी सारखी भिती वाटत आहे.

आजचा शाळा महाविद्यालयाचा विद्यार्थी असज्ञ निराश-निरागस, अनास्था असलेला का आहे ? याचा आई -वडील-शिक्षक व समाजाने विचार करावयास हवा. अर्थात यास आजची झपाट्याने बदलत जाणारी भोग्य संस्कृती होय. दूरदर्शन, चित्रपट, अश्लील गाणी, चित्रपटातील अश्लील दृष्य, टी.व्ही.चे दर्जाहिन दृष्य व सिनेमा याचा युवा पिढीवर फार मोठा परिणाम झालेला आहे. तद्त्वतच तो बालमनावर ही फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे संपूर्ण समाज या विकृतीच्या खाईकडे ओढल्या जात आहे. या परिस्थितीला वेळीच आळा घातला नाही तर आजची युवा पिढी व उद्याची बालके ही आपले संपूर्ण आयुष्य बेचिराख करून बसतील व या देशातील समाज व्यवस्था कोलमडेल, संस्कृती विकृतीकडे झुकेल, मानमर्यादा आदरभाव पायंदळी तुडविल्या जाईल व समाजात रानटीपणा माजून समाजाची अवस्था जंगली प्राण्यासारखी होईल. यात तीळ मात्र शंका नाही.

या परिस्थितीला वेळीच पायबंद घालावयाचा असेल तर पालक-शिक्षक यांनी एकत्र बसून विद्यार्थ्यांच्या विविध समस्या व अडचणीवर चर्चा करून त्यावर मार्ग काढण्याची नितांत गरज आहे. पालक व शिक्षक यांच्यात विद्यार्थ्यांच्या समस्या बाबत सुसंवाद साधला गेला तर उद्या भारतीय समाजावर व भारतीय संस्कृतीवर तसेच सामाजिक मुल्यांवर येऊ पाहणारे संकट सहज थोपविता येईल व मानवी मूल्य व सांस्कृतिक मुल्यांची जपणूक केल्या जाईल.

२१ व्या शतकात आपण असतांना या स्पर्धा व विज्ञानाच्या युगात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने कठोर परिश्रम करण्याची गरज आहे. आपल्या कामावर व कर्तव्यावर श्रद्धा ठेवून आपले मन सतत विधायक व चांगल्या कामात गुंतवून ठेवावयास हवे. मुलांच्या शैक्षणिक समस्या या असू शकतात. परंतु या समस्या पूर्ण करता येणार नाही असे काही असू शकत नाही यासाठी पालक व शिक्षक यांच्या सुसंवादातून सहज सुटू शकतात यासाठी पालक शिक्षक मेळावे भरविण्याची किंवा आयोजित करण्याची नितांत गरज आहे.

हल्लीचे पालक आपला व्यवसाय, नौकरी, उद्योगधंदे यात गूंफलेले आहेत. त्यांना पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्यास वेळ कुठे आहे. आजच्या पालकांची आजच्या शिक्षणाबाबत उदासिनता आहे म्हणून पाल्या बाबतही ते उदासीन राहतात. परंतु याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर प्रतिकूल असा परिणाम होत आहे. संख्या बरोबरच जेव्हा गुणवत्ता वाढते तेव्हाच खरी प्रगती झाली असे म्हणता येते. यासाठी संख्यात्मक प्रगती महत्वाची नसून ती गुणात्मक प्रगती होणे गरजेचे आहे. यासाठी विद्यार्थी अधिक कष्टाळू व शिस्तप्रिय व मानमर्यादा पाळणारा असावयास पाहिजे. शिक्षकांची भूमिका ही दिपकाची भूमिका असायला हवी. शिक्षक अतिशय निष्ठावान व उपक्रमशिल असावयास पाहिजे तर पालकही अधिक जागृत व कर्तव्यदक्ष असणे गरजेचे आहे. अध्ययन करीत असतांना विद्यार्थ्यांनी चिंतन व मननाची सवय लावून घेतली तर त्याचा आत्मविश्वास आणखी दृढ होईल यात तिळमात्र शंका नाही. शिक्षकाच्या बाबत म्हणतात की, 'जगाचा कधीकाळी विकास व्हायचा असेल तर तो शिक्षकांच्या हस्तेच होवू शकेल'. वास्तविक पाहता शिक्षकांना विद्यार्थ्यांना संस्कारक्षम करण्यासाठी फार काही वेगळे करण्याची गरज नाही. अध्ययन अध्यापनाचे कार्य करीत असतांना मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व भूगोलाच्या पाठातून विद्यार्थ्यांच्या मनावर जर शिक्षकांनी आदर्शाचे संस्कार बिंबवले तर आजचे विद्यार्थी उद्याचे या समाजाचे या देशाचे सुजाण, संस्कृत व आदर्श नागरीक घडतील, यात तीळ मात्र शंका नाही. यासाठी शिक्षकांनी वर्गातच प्रयत्न करण्याची गरज आहे. शालेय पुस्तकातील पाठातून, परिपाठातून, व विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून आदर्श व सुसंस्काराचे धडे सहज गिरविल्या जाऊन शकतात. पालकांनाही आपल्या पाल्याबाबत जागृत रहावयास हवे. त्यांच्या आवडी निवडीचा विचार करून त्यावर अभ्यासाचे ओझे लादू नये तर त्याला त्याच्या आवडीनुसार अध्ययन निवडीचे स्वातंत्र्य द्यावयास हवे. पालकांनी शाळा कॉलेजात जावून पाल्याच्या शैक्षणिक बाबीची चौकशी करावयास हवी. त्यांना वाईट सवयी व वाम मार्गापासून लांब ठेवावयास हवे. त्यांच्या वेगळ्या वाटणाऱ्या हालचालींची त्वरीत दखल घ्यावी तरच आजचा विद्यार्थी हा विधायक दृष्टीकोन धारण केलेला असू शकेल. शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. असे असतांना पालकांनी शिक्षणाबाबत उदासिन न होता आपल्या सर्व पाल्यांना पूर्ण शिक्षण द्यावे.

वाढत्या विघातक कामांना आळा घालण्यासाठी पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद होणे गरजेचे आहे. पाल्याच्या प्रत्येक बाबी बाबत पालकांनी दक्ष रहावे. व समाजोन्नती घडवून आणावी. हे काम अवघड नाही. परंतु वेळ लागणारे काम आहे. शिक्षणाचा अर्थ नौकरीशी कोणत्याही पालकाने न लावलेला बरा. शिक्षण म्हणजे मानवाला मानव म्हणून जगण्यास सांगणारे ते एक माध्यम आहे. त्याशिवाय माणूस खरे जीवन जगू शकत नाही.

## शिक्षकांच्या कर्तव्याला प्रणाम

शिक्षकांची जगी असे थोर--महान कीर्ती
शिक्षकांच्या उपदेशाने मिळे सर्वांना स्फूर्ती
शिक्षकांच्या शिकवणुकीने विद्यार्थी जीवनाला आकार
विद्यार्थी जीवनाचे भविष्य शिक्षकांमुळेच साकार
जगाचे कल्याण करणारा शिक्षक दिसतो सर्वत्र
ज्ञानासाठी सर्व विद्यार्थी ज्ञान मंदिरात एकत्र
शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दैवत मानावे
त्यांचे उज्वल भविष्य ज्ञान दानातून घडवावे
शिक्षकच विद्यार्थ्यांचे भवितव्य साकारतो
विद्यार्थ्यांत गुणवत्ता प्रामाणिकता आणतो
शिक्षकांच्या कर्तव्याला प्रणाम करू या
शिक्षक दिनी त्यांना शुभेच्छा देऊ या.

– धोंडीरामसिंह राजपूत

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार

५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि समाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.

बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक्श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्याच्या मनातील भीती ओळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा समतोल राखणे आवश्यक आहे.

या बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला मदत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.

शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये असलेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. 'हे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला 'कमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.

या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.

आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे.

विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.

पर्यावरणीय संकटे, पाण्याची समस्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.

शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि मूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या यशाबरोबर समाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.

शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.

शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हातात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

५ सप्टेंबरचा शिक्षक दिन एका दिवसापुरत्या औपचारिक शुभेच्छांमध्ये अडकून राहू नये. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण आणि समताधिष्ठित शिक्षण मिळावे, प्रत्येक शिक्षकाला सन्मानपूर्वक व अनुकूल कार्यपरिस्थिती मिळावी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, डिजिटल दरी कमी व्हावी, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि शिक्षणातून संवेदनशील, विवेकी व जबाबदार नागरिक घडावेत, हा व्यापक संकल्प या दिवसातून पुढे यायला हवा. शिक्षकाच्या हातातील खडू, लेखणी किंवा डिजिटल साधन हे केवळ अध्यापनाचे माध्यम नसते; त्यातून एका पिढीच्या विचारविश्वाची निर्मिती होत असते. म्हणूनच शिक्षक हा केवळ वर्गखोलीतील अध्यापक नसून उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मनःपूर्वक अभिवादन करणे, त्यांच्या कार्याला सक्षम वातावरण उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना समान संधी देणे हीच शिक्षक दिनाची खरी सार्थकता ठरेल.

– डॉ. राजेंद्र बगाटे

# श्रीकृष्णाची महिमा अपरंपार

**श्रावण** कृष्णपक्ष अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव संपूर्ण भारतात गोकुळ अष्टमी किंवा श्रीकृष्ण जन्माष्टमी या नावाने मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा केल्या जातो. पौराणिक कथेनुसार कृष्णाचा जन्म मथुरा येथे वासुदेव आणि देवकीच्या पोटी झाला.तेव्हा या दोघांना कंसाने बंदीस्त करून ठेवले होते. कंस हा अहंकारी राजा होता.त्याच्या अहंकाराने प्रजा अत्यंत त्रस्त होती.अशा परिस्थितीत आकाशवाणी होते. त्यात कंसाला सांगितले जाते की हे कसं तुझा शेवट देवकीचा आठवा पुत्र करेल. आकाशवाणीमुळे कंस भयभीत होतो आणि वासुदेव व देवकीला बंदीस्त करतो. अशा परिस्थितीत देवकीला सात पुत्र होतात त्यांचा सर्वांचा वध कंस करतो. यात आठवा पुत्र श्रीकृष्ण वाचतो आणि पुन्हा आकाशवाणी होते हे कंसा ज्याच्या हातांनी तुझा मृत्यू होणार आहे त्यांनी जन्म घेतलेला आहे सावधान!महाभारत ही पौराणिक कथा आहेच.परंतु आपल्या जीवनात घडणारे प्रसंग सुध्दा आहेत.जन्माष्टमीचा सण श्रावण महिन्यातील कृष्णपक्षातील अष्टमीला साजरा करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.श्रावण महिन्यांतील कृष्णपक्षातील अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्म

झाला.जन्माष्टमीच्या दिवशी लोक भक्तिभावाने उपवास करून पुजाअर्चना करतात व श्रीकृष्णाच्या जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. हा उपवास नवमीला संपतो. संपुर्ण भारतात आपल्याला जन्माष्टमीचा अनेक मोठ-मोठे कार्यक्रम पहायला मिळतात. या निमित्ताने मोठ्या प्रमाणात दहिहंडीचे कार्यक्रम दिसून येतात. अनेक बालगोपाल (गोविंदा)या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा करतात. जन्माष्टमीच्या दिवशी अनेक भाविक श्रीकृष्णाची स्थापना करतात व मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात येते.कोणाकडे श्रीकृष्ण (काणोबा) दिड दिवसांचा असतो तर कोणाकडे पाच दिवसांचा असतो.या कालावधीत पुजाअर्चना करून आपली मनोकामना पूर्ण करण्याचे साकडे भक्तगण घालतात व विसर्जनाच्या दिवशी घरगुती दहिहांडी फोडून काला करतात आणि सर्वांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतो. भगवान श्रीकृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत.अहंकारी कंसाचा वध करण्यासाठी भगवान विष्णूंनी श्रीकृष्णावतार धारण केला व कृष्णाने मामा कंसाचा वध केला.ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण लहाण्याचे मोठे झाले ते ठिकाण म्हणजे उत्तर प्रदेशातील (मथुरा-वृंदावन) याठिकाणी जन्माष्टमीला मोठे उत्साहाचे आनंदाचे वातावरण असते.भारतातील संपूर्ण श्रीकृष्ण मंदिरांची सजावट करून मोठ्या थाटामाटात उत्सव साजरा केला जातो.भारतातील जगप्रसिद्ध मथुरा आणि वृंदावनमधील सर्व श्रीकृष्ण मंदिरे पहाण्यासाठी देशातील तसेच जगाच्या कानाकोर्पयातून भक्तगण व पर्यटक इथे येऊन श्रीकृष्णाचे दर्शन घेतात.गुजरातमधील व्दारका येथे एक वेगळा उत्सव साजरा केला जातो या ठिकाणी कृष्णाने आपले राज्य स्थापन केले होते.महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये जन्माष्टमीच्या दरम्यान दही हंडीचे कार्यक्रम करून उत्सव साजरा करतात.त्याचप्रमाणे गुजरात मधील कच्छ जिल्ह्यातील शेतकरी बैलगाड्या सजवून त्यावर भगवान श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून नाचत-गाजत मिरवणुक काढतात.अशाप्रकारे संपूर्ण भारतात जन्माष्टमी आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.महाभारतात श्रीकृष्णाने सत्याची बाजू घेत शेवटपर्यंत अर्जुनाचे सारथी रहाले.बाळ श्री कृष्ण दही आणि लोणी नेहमी खायचा त्यांचे आवडीचे प्रतीक आणि आपल्यासाठी प्रसाद म्हणून महाराष्ट्रात दहीहंडीची प्रथा आहे.

जन्माष्मी भारतातच नाही तर जगातील अनेक देशांतील भारतीय श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या थाटामाटात साजरी करतात. कारण भारतातील संस्कृतीने अनेक देशांना बरेच काही दिले आहे. देवकी मानवी देहाचे प्रतीक मानले जाते तर वासुदेव प्राणशक्तीचे प्रतीक आहे.मानवी देहामध्ये जेव्हा प्राणशक्ती वृध्दिंगत होते तेव्हा भगवान श्रीकृष्णाची म्हणजे आनंदाची अनुभूती प्राप्त होते. त्यामुळे आपल्याला सर्वत्र मंगलमय वातावरण दिसून येते.

सृष्टीचे पालनहार म्हणजे विष्णूचे आठवे अवतार भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मत्सोवाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला पाहिजे.कारण श्रीकृष्णाचा सहवास बालगोपालांसोबत वृक्षांच्या सानिध्यात रहायचा. त्यामुळे आज आपणास सर्वांवर ती वेळ येऊन ठेपली आहे की वृक्ष बिना जीवन अधुरे आहे. यामुळे आज वृक्ष लागवड अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल, गुरांना चारा उपलब्ध होईल, ऑक्सिजनची मात्रा वाढेल व संपूर्ण भारत भुमि (सृष्टी) प्रफुल्लित राहील आणि निसर्गाची व पृथ्वी मातेची रक्षा करण्यास मोठी मदत होईल.गोकुळ अष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा!

–रमेश कृष्णराव लांजेवार, नागपूर



**कृष्ण लीला– कविता –श्रीकृष्ण जयंती**

श्रीकृष्ण जन्माची किती वर्णावी थोरवी
प्रत्येकाच्या मुखात कृष्ण नामाची गोडवी
जन्म:ताच कृष्णाच्या लीला अति महान
आश्चर्यचकित झाले थोर आणि लहान
न्यायासाठी पक्ष न्यायासाठी लढा
भल्या-भल्याना शिकविला
न्यायाचा धडा गीतेतूनही केली
शुभ उपदेश पेरणी जैसी असे करणी
तैशीच असे भरणी कृष्ण लीलांची
किती वर्णावी कीर्ती कृष्ण लीलांनी
मिळे शुभ संकल्प स्फूर्ती श्रीकृष्ण
भगवंताना नेहमी करू वंदन
लावून मस्तकी श्रीकृष्ण चंदन

– धोंडीरामसिंह राजपूत

# ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या लढ्याला मोठे यश

## पत्रकारांच्या एसटी प्रवास सवलतीचा प्रश्न अखेर मार्गी; परिवहन मंत्र्यांचे तातडीने आदेश

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) – अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून मिळणारी १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत एनसीएमसी कार्डच्या नव्या यंत्रणेत उपलब्ध होत नसल्याने निर्माण झालेल्या गंभीर अडचणीची परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी तातडीने दखल घेतली असून, पत्रकारांची प्रवास सवलत सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणेत आवश्यक दुरुस्ती करून सिस्टीम अपडेट करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्यभरातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना मोठा दिलासा मिळाला असून, व्हॉईस ऑफ मीडिया, व्हीओएम इंटरनॅशनल फोरमच्या अवघ्या एका दिवसाच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.

एनसीएमसी कार्डसाठी वापरण्यात येणाऱ्या नव्या मशीनमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना लागू असलेली १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत समाविष्ट नसल्याने राज्यातील अनेक पत्रकारांना एसटीमधून प्रवास करताना पूर्ण तिकीट काढावे लागत होते. नव्या यंत्रणेतील या तांत्रिक त्रुटीमुळे पत्रकार आणि एसटीचे चालक-वाहक यांच्यात गैरसमज आणि वाद निर्माण होत असल्याच्या तक्रारीही राज्यभरातून प्राप्त झाल्या होत्या. पत्रकारांना त्यांच्या हक्काच्या प्रवास सवलतीपासून वंचित ठेवणारी ही परिस्थिती तातडीने दूर करावी, अशी मागणी व्हॉईस ऑफ मीडिया, व्हीओएम इंटरनॅशनल फोरमने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली होती.

पत्रकारांसाठी पर्यायी एनसीएमसी कार्ड उपलब्ध होण्यासाठी जवळपास दोन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याची परिस्थिती असताना, तोपर्यंत अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनी पूर्ण तिकीट काढून प्रवास करायचा का, असा थेट सवाल व्हॉईस ऑफ मीडियाने प्रशासनासमोर उपस्थित केला होता. कार्डची प्रक्रिया सुरू होण्यासाठी सुमारे १५ दिवस आणि त्यानंतर कार्ड प्रत्यक्ष मिळण्यासाठी आणखी सुमारे ४५ दिवस लागणार असल्याने या कालावधीत पत्रकारांना त्यांच्या प्रवास सवलतीपासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले होते.

व्हॉईस ऑफ मीडियाने गुरुवारी परिवहन मंत्र्यांच्या कार्यालयात निवेदन सादर करून एनसीएमसी कार्ड आणि यंत्रणेतील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्याबरोबरच पत्रकारांना लागू असलेली १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत सिस्टीममध्ये समाविष्ट करून ती अपडेट करण्याची मागणी केली. सिस्टीम अपडेट होईपर्यंत पूर्वीच्या कार्डच्या आधारे अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत सुरू ठेवण्याबाबत राज्यातील सर्व आगार व्यवस्थापकांमार्फत चालक-वाहकांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, अशीही मागणी करण्यात आली होती. प्रत्येक चालक आणि वाहकाला या आदेशाची माहिती झाली आहे, याची खात्री करण्याची जबाबदारी आगारप्रमुखांवर सोपवावी, जेणेकरून पत्रकार आणि एसटी कर्मचाऱ्यांमध्ये अनावश्यक वाद निर्माण होणार नाहीत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले होते. मंत्री यांची ही भेट घेतली होती.

पत्रकारांना बातम्यांचे संकलन, अपघात, नैसर्गिक आपत्ती, सामाजिक प्रश्न, शासनाच्या योजना तसेच जनतेच्या विविध समस्या यांचे वार्तांकन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यात सातत्याने प्रवास करावा लागतो. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत एसटी ही पत्रकारांसाठी अत्यंत महत्त्वाची प्रवास व्यवस्था आहे. त्यामुळे प्रवास सवलत बंद झाल्यास पत्रकारांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत होता. या पार्श्वभूमीवर पत्रकारांची सवलत तातडीने पूर्ववत करणे आवश्यक असल्याची भूमिका व्हॉईस ऑफ मीडियाने घेतली होती.

दरम्यान, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या तक्रारीची तातडीने दखल घेत संबंधित यंत्रणेला आवश्यक तांत्रिक दुरुस्ती करून सिस्टम अपडेट करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे एनसीएमसीच्या नव्या यंत्रणेमुळे निर्माण झालेली पत्रकारांच्या प्रवास सवलतीची अडचण दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परिवहन मंत्र्यांच्या या निर्णयामुळे राज्यभरातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यासोबतच अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बससेवांमध्ये प्रवास सवलत लागू करण्याची मागणीही व्हॉईस ऑफ मीडियाने केली आहे. स्लीपर कोच, पुणे-मुंबई-नाशिक मार्गावरील शिवनेरी, शिवाई, विद्युत बस तसेच इतर प्रीमियम सेवांमध्येही पत्रकारांना १०० टक्के प्रवास सवलत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आधुनिक आणि जलद बससेवा उपलब्ध असताना पत्रकारांना केवळ काही विशिष्ट बससेवांपुरती प्रवास सवलत मर्यादित ठेवणे योग्य नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

पत्रकारांच्या एसटी प्रवास सवलतीचा प्रश्न समोर येताच व्हॉईस ऑफ मीडियाने तातडीने प्रशासनाकडे पाठपुरावा केला आणि अवघ्या एका दिवसात परिवहन मंत्र्यांनी या प्रश्नाची दखल घेत सिस्टीम अपडेट करण्याचे आदेश दिल्याने संघटनेच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. पत्रकारांच्या हक्कांसाठी केवळ निवेदन देऊन न थांबता प्रश्न सुटेपर्यंत पाठपुरावा करण्याची भूमिका व्हॉईस ऑफ मीडियाने पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

ङ्कार्ड द्या; मात्र कार्ड मिळेपर्यंत पत्रकारांची प्रवास सवलत बंद करू नका. तांत्रिक अडचणीमुळे अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना त्यांच्या हक्काच्या सुविधेपासून वंचित ठेवता येणार नाही. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तातडीने दखल घेऊन सिस्टीम अपडेट करण्याचे आदेश दिल्याबद्दल व्हॉईस ऑफ मीडिया त्यांचे आभार मानते. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी यापुढेही संघटना सातत्याने पाठपुरावा करेल,ङ्ख अशी भूमिका व्हॉईस ऑफ मीडिया,व्हीओएम इंटरनॅशनल फोरमने व्यक्त केली.

व्हॉईस ऑफ मीडिया,व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया, नरेंद्र देशमुख, अजितदादा कुंकूलोळ या सह सर्व पदाधिकारी सदस्य यांनी परिवहन मंत्र्याचे आभार मानले आहेत. पत्रकारांच्या प्रवास सवलतीचा प्रश्न तातडीने मार्गी लावल्याने राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांमध्ये समाधान व्यक्त होत असून, व्हॉईस ऑफ मीडियाच्या पाठपुराव्याचे हे आणखी एक महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे.

## योगेश्वर श्रीकृष्ण

भगवान श्रीकृष्ण योगेश्वर होते. देवकी जन्मदाती तर यशोदा पालनकर्ती. अशा श्री. भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म श्रावण कृष्ण अष्टमीला रात्री बारा वाजता झाला. कृष्णावतारात सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दलीन करीत असताना नरकासुराचा तावडीतून १६ हजार कुमारिकांची सुटका कृष्णाने केली. दुष्ट राक्षसांचा संहार केला. त्या कुमारिका आपल्या आई वडिलांकडे जाण्यास तयार नव्हत्या, समाज आणि आई वडील त्याना स्वीकारणार नाही, याची त्यांना खात्री होती. त्या कृष्णाला शरण आल्या. त्यांना आश्रय दिला त्यांचे पुनर्वसन केले. त्यांच्या करिता द्वारका वसविली. कृष्णाने त्या १६हजार स्त्रियांचे पुनर्वसन केले त्यांना आश्रय दिला म्हणून श्रीकृष्ण योगेश्वर होते. महाभारत युद्धाच्या वेळी बलरामची बहीण सुभद्रा ही अर्जुनाची पत्नी होती. तिचा मुलगा अभिमन्यू कपटाने युद्धात मारला गेला. त्याची पत्नी विराट राजाची मुलगी उत्तरा त्यावेळी गर्भवती होती. कौरवांनी पांडवांचा वंशनाश व्हावा म्हणून उत्तरेच्या गर्भभोवती असे अस्त्र सोडले की गर्भपात व्हावा, उत्तरेच्या गर्भात अतिदाह होत होता. कृष्णाला हे समजल्यावर तेंव्हा श्रीकृष्णानी प्रतिज्ञा केली की, मी जर ब्रह्मचारी असेल तर उत्तरेच्या गर्भातील बाळ सुरक्षित राहील, बाळ सुरक्षित राहीले व त्याचा जन्म ही सुरक्षित झाला, त्याचे नाव परीक्षित होय, यावरून असे दिसून येते की, भगवान श्रीकृष्ण ब्रह्मचारी होते. जरी श्रीकृष्ण पती म्हणून होते तरी ते खरे योगेश्वर होते. अन्याय व अत्याचारी विरुद्ध श्रीकृष्ण यांनी नेहमीच लढा दिला, आज त्यांची जयंती या निमित्ताने त्यांच्या असंख्य विधायक लिलाना कोटी!कोटी!! प्रणाम, जय श्रीकृष्ण!

– धोंडीरामसिंह राजपूत

### दही हंडी--गोपाल काला

बाल गोपाल गल्लीत जमले
गोपाल काला करू म्हणाले
कुणी आणल्या लाह्या कुणी आणली दही हंडी
गल्लीत मुलांची भरली जणू भाजी मंडी
उंचावर दोर मुलांनी बांधला
हंडीसह प्रसाद त्याला टांगला
एकावर एक मुलं राहिली उभी
सुंदर दिसे त्यांची हास्य छबी
गोविंदा! गोविंदा!! म्हणू लागली मुले
हसरी -नाचारी जणू बागेतील फुले
टचकन हंडी गोविंदाने फोडली
लाह्या दह्याची बरसात झाली
गोपाल काला गल्लीत रमला
सर्व मुलांनी आनंद लुटला

– धोंडीरामसिंह राजपुत

## गोपाळकाला सणाला आध्यात्मिक आणि पौराणिक पार्श्वभूमी

गोपाळकाला म्हटले की, उंचच्या उंच हंड्या आणि त्या फोडण्यासाठी जिवाचे रान करणारे तरुण डोळ्यांसमोर येतात; मात्र गोपाळकाला या सणाला आध्यात्मिक आणि पौराणिक पार्श्वभूमी असून ते शास्त्र लक्षात घेऊन साजरा केल्याने जिवाला त्याची अनुभूती घेता येते. गोपाळकाल्याचे अध्यात्मिक महत्त्व आणि त्याचे लाभ यांविषयीची माहिती या लेखातून जाणून घेऊया.

१. ‘गोपाळकाला’चा अर्थ

अ. श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिर्दोया एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली. आ. गोपाळकाला म्हणजे पांढया रंगाच्या पाच रसात्मक स्वादांचा अधिकाधिक प्रमाणात निर्गुण चैतन्याशी संबंध दर्शवणारा आणि पूर्णावतारी कृष्णकार्याचे दर्शक असलेला समूच्चय. ‘काला’ हा शब्द एकसंध आणि वेगात सातत्य असर्णाया क्रियेशी संबंधित आहे. ‘काला’ म्हणजे त्या काळाला, त्या स्थळाला, त्या त्या स्तरावर आवश्यक असे वैशिष्टपूर्ण कार्य दर्शवर्णाया घटनांचे एकत्रिकरण. पूर्णावतारी कार्य हे स्थळ, काळ आणि स्तर या तीनही घटकांवर आदर्शवत असेच असते. या कार्यप्रक्रियेत विविधांगी जीवनाचे पैलू आध्यात्मिकरीत्या ईश्वरी नियोजनाद्वारे मानवजातीसमोर लीलया उलगडून दाखवले जातात. ‘गोपाळकाला’ हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पूर्णावतारी कार्याचे प्रतिनिधित्व करतो.

२. काल्यातील प्रमुख घटक

पोहे, दही, दूध, ताक आणि लोणी हे काल्यातील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत.

अ. पोहे : वस्तूनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक (काहीही झाले, तरी श्रीकृष्णाला धरून ठेवणारे सवंगडी)

आ. दही : वात्सल्यभावातून प्रसंगी शिक्षा करणाया मातृभक्तीचे प्रतीक

इ. दूध : गोपींच्या सहज सगुण मधुराभक्तीचे प्रतीक

ई. ताक : गोपींच्या विरोधभक्तीचे प्रतीक

उ. लोणी : सर्वांच्या श्रीकृष्णावरील अवीट प्रेमाच्या निर्गुण भक्तीचे प्रतीक

या दिवशी ब्रह्मांडात कृष्णतत्त्वाच्या आपतत्त्वात्मक प्रवाही गतिमान लहरींचे आगमन होते. काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात.

३. गोपाळकाला, गोपाळकाल्याची दिव्य चव आणि दहीहंडी फोडणे यांचा भावार्थ

अ. गोपाळकाला.

दृश्य स्वरूपात गोपाळकाला म्हणजे कीर्तनानंतर किंवा गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी फोडून ग्रहण करतो, तो प्रसाद.

आ. गोपाळकाल्याची दिव्य चव

वरील सर्व पदार्थ एकत्र आणि एकजीव करून ग्रहण केल्यावर त्याची चव अवर्णनीय असते. त्याची चव अतिशय दिव्य असते.

इ. दहीहंडी फोडणे

दहीहंडी हे जिवाचे प्रतीक आहे. दहीहंडी फोडणे, हे जिवाने देहबुद्धी सोडून आत्मबुद्धीत स्थिर होणे, या अर्थाने आहे आणि दिव्य चव हे आनंदाचे प्रतीक आहे.

**गोपाळ काल्याचे पावित्र्य राखण्यासाठी हे टाळा !**

१. लाखो रुपयांच्या दहीहंडी स्पर्धा आयोजित करून केले जाणारे उत्सवाचे व्यापारीकरण !
२. उत्सवासाठी तंबाखू, गुटखा आदींची विज्ञापने किंवा त्यांच्या उत्पादकांचे प्रायोजकत्व !
३. या निमित्ताने होणारी वाटमारी, मद्यपान, बीभत्स नाच, पाण्याचे फुगे मारणे व महिलांची छेडछाड !
४. ४० फुटांहून अधिक उंचीवरील दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांची धोकादायक कसरत !

**हिंदुनो, गोपाळकाल्यातील अपप्रकार रोखण्यासाठी हे करा!**

१. वाटमारी, महिलांची छेडछाड आदी अपप्रकार आढळल्यास पोलिसांत तक्रार करा !
२. गोकुळाष्टमी उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना भेटून अपप्रकारांविषयी त्यांचे प्रबोधन करा !

## दहीहंडी : एक साहसी व कलात्मक उत्सव

**दहीहंडी** उत्सव म्हणजे एकत्र जमणाऱ्या सर्व गोविंदाचा एक सामाजिक,साहसी व कलात्मक उत्सव होय.महाराष्ट्र शासनाने दहीहंडी उत्सव शासनाच्या साहसी खेळामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय यातच या उत्सवाचे महत्व दिसून येते.भगवंत श्रीकृष्ण यांचा एक आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही सर्व गोविंदा मंडळी समाजात विधायक, रचनात्मक व श्रद्धेचा पाया रचून

न्याय कार्यसाठी आपली कला,कौशल्य व साहसाचे प्रात्यक्षिक दाखवून समाजाला योग्य व सकारात्मक दिशा दर्शविण्याचे उपक्रम राबवितेअसे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.या दहीहंडी उत्सवातून समाजातील विविध थरातील युवक एकत्र येतात,हे सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे. वेगवेगळ्या विचार व संप्रदाय चे युवक एकत्र येणे म्हणजे सामाजिक ऐक्याचे दर्शन होय.सामाजिक संघटितपणा दहीहंडी

उपक्रमातून दिसून येतो.या दहीहंडी उपक्रमातून गोविंदांच्या कला,कौशल्य, संयम, सहकार्य, व समनव्याचे दर्शन घडते,दहीहंडीचे मनोरे व मिनार सामाजिक ऐक्याचे प्रतीक होय.गोविंदाचा प्रचंड आत्मविश्वास बळावणार हा उत्सव होय,अत्यन्त संयमाने गोविंदा मनोरे उभारतात एकावर एक उभे राहून हंडी पर्यंत गोविंदा पोहचतो व हंडी फोडतो हे प्रचंड साहस व आत्मविश्वासाचे लक्षण आहे.

‘एकमेका सहाय्य करू--अवघे आपण सुपंथ धरू‘ असा संदेश देणारा हा उत्सव होय.दहीहंडीतून

साहस,धाडस, धीरोदात्तपणा,व विश्वास सारखे गुण जोपासल्या जातात.गोविंदांचा हा उपक्रम भगवान श्रीकृष्ण यांच्या सर्वगुणसंपन्नतेचा आदर व सन्मान करणारा उत्सव होय.गोविंदानी दहीहंडी उत्सव साजरा करीत असताना आपली सर्वांची काळजी घेणे गरजेचे आहे.सर्वांचा विमा उतरून घ्यावा,शिरस्त्राण वापरावे,,सेफ्टी हार्णेस वापरावे,जमिनीवर गादी सारख्या नरम वस्तू टाकून ठेवाव्यात अंबुलन्स,व अग्निशमन गाडी जवळच असावी, रुग्णवाहिकेसोबत डॉक्टर व प्रथमोपचार साहित्य असावे .प्रेक्षकांनी शांतता व संयम बाळगावा.सहभागी गोविंदानी उत्सवास साजेशी भूमिका पार पाडावी अशी अपेक्षा.

– धोंडीरामसिंह राजपूत

## शिक्षकांची कर्तव्ये व निष्ठा

‘**जगाचे** कधी काळी कल्याण व्हायचे तर शिक्षकांच्या द्वारेच होईल’. कारण शिक्षकच एकमेव असा घटक आहे जो देशाच्या उद्याच्या राष्ट्रसंपत्ती असलेल्या विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय व विद्यापीठात ज्ञानदान करून विद्यार्थी जीवनाला सु-योग्य आकार देऊन त्या विद्यार्थ्यांत शैक्षणिक व पुस्तकी ज्ञाना व्यतिरिक्त समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा व कौटुंबिकनिष्ठा व विधायक कर्तव्यनिष्ठा सारखे उच्च प्रतीचे संस्कार बिंबिवत असतो.तसेच सामाजिक, नैतिक, नीतिमत्ता, प्रामाणिकता,या मूल्यांचे ही मार्गदर्शन करतो म्हणून शिक्षकांची भूमिका विशेषतः महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांची भूमिका व कर्तव्ये यापुढे अत्यंत जबाबदारीची असणार आहेत.सर्व थरावरील शिक्षकांनी आपले ज्ञानदान कार्य अत्यंत प्रामाणिकपणे , कर्तव्यनिष्ठपणे व जबाबदारीने पार पाडण्याची गरज भविष्यात आहे. ‘शिक्षक हा सामाजिक अभियंता आहे‘ तो विद्यार्थी जीवनाची सजीव इमारत सक्षमपणे ऊभी करू शकतो.शिक्षक व्यवसायाच्या निष्ठा १) शिक्षक हा विद्यार्थी निष्ठ असावा २) शिक्षक हा ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान निष्ठ असावा ३) शिक्षक हा समाज निष्ठ असावा ४) शिक्षक हा राष्ट्र निष्ठ असावा ५) शिक्षक हा कर्तव्य निष्ठ असावा. या पांच निष्ठा शिक्षकी व्यवसायात असणाऱ्या शिक्षकांच्या अंगी असाव्यातच तरच देशाची, राष्ट्राची संपन्नता, सामर्थ्यशिलता, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान शिलता भविष्यात उज्वल असेल. ज्या देशातील शिक्षणाचा दर्जा उच्च त्या देशातील विद्यार्थी व त्यांचे चारित्र्य, वर्तणूक, क्रियाशीलत्व ही उत्तम.त्या देशाचा नावलौकिक संपूर्ण विश्वात दुमदुमतो.शैक्षणिक संस्थांतील शिक्षकांचे संबध प्रगतिला पोषक,व शाळा, महाविद्यालयाचा लौकिक वाढविणारे असावे.

– धोंडीरामसिंह राजपूत
वैजापूर संभाजीनगर

## महानगरपालिका लोकशाही दिन ७ सप्टेंबर रोजी

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) – महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो. माहे सप्टेंबर २०२६ चा महानगरपालिका लोकशाही दिन सोम वार दि.०७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रशासकीय समिती कक्ष ,मनपा मुख्यालय येथे मां.आयुक्त यांचे अध्यक्षते खाली आयोजीत करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारित परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर विहित नमुन्यात आवश्यक कागद पत्रासह अर्ज दिलेल्या नागरिकांनाच दि.०७ सप्टेंबर २०२६ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील ,याची नोंद घ्यावी. ज्यांनी या पूर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही असे अपर्णा थेटे – सेडमकर उप आयुक्त ०२ तथा मुख्य समन्वयक लोकशाही दिन छत्रपती संभाजीनगर पालिका यांनी कळविले आहे.

## गणेशोत्सवातील उत्कृष्ट सार्वजनिक मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यानंतर या उपक्रमाचा विस्तार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर केला आहे. २०२६ च्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रासह देशातील तसेच परदेशातील सामाजिक व विधायक उपक्रमांद्वारे गणेशोत्सव साजरा करणाऱ्या सार्वजनिक मंडळांनाही या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत. अर्जासाठी https://ganeshotsav.pldmka.co.in/ या संकेतस्थळाचा वापर करावा. इच्छुक मंडळांनी विहित नमुन्यातील माहिती व आवश्यक कागदपत्रे सादर करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. यंदाचा गणेशोत्सव १४ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होत असून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांकडून मंडळांच्या उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन विविध निकषांच्या आधारे अभिप्रायासह गुणांकन करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय समिती उत्कृष्ट तीन गणेशोत्सव मंडळांची शिफारस करणार असून, संबंधित मंडळांची नावे, आवश्यक कागदपत्रे, व्हिडीओ व अभिप्राय यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर राज्यस्तरीय समितीमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

स्पर्धेचा निकाल जाहीर करण्याची तारीख तसेच विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पुरस्कार वितरण समारंभाबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील, असेही मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी कळविले आहे.

## नवी मुंबईहून श्रीनगरला जाणारे इंडिगोचे विमान विमानतळावर पार्किंग करताना खांबाला धडकले; सर्व प्रवासी सुरक्षित

नवी मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) –जम्मू-काश्मीरच्या श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी सकाळी एक मोठा अपघात टळला. नवी मुंबईहून श्रीनगरला पोहोचलेले इंडिगो एअरलाइन्सचे विमान लँडिंगनंतर पार्किंग बे कडे जात असताना रनवेवरील पोलला जाऊन धडकले. या धडकेमुळे विमानाचे पुढच्या भागाचे (नोज सेक्शन) किरकोळ नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने विमानात सवार सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स पूर्णपणे सुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे.

**विजुअल डॉकिंग गाइडेंस सिस्टम पोलला धडक**

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ९:०२ च्या सुमारास नवी मुंबईहून श्रीनगरला आलेले इंडिगोचे '6E 225' हे विमान श्रीनगर विमानतळावरील ‘बे नंबर ०६’ कडे पार्क करण्यासाठी जात होते. याच दरम्यान विमानाचे नियंत्रण सुटल्याने ते विजुअल डॉकिंग गाइडेंस सिस्टम (VDGS) च्या पोलला जाऊन धडकले. या पोलवर लेझर आणि कॅमेरा सेन्सर्स बसवलेले असतात. ब्रेकिंग सिस्टिम फेल झाल्यामुळे हा अपघात झाल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क स्पर्धापरीक्षा रविवारी (दि.६)

## १४ केंद्रांवर ४ हजार ७५२ परीक्षार्थींची बैठक व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्यामार्फत आयोजित मुंबईचे नगरपाल कार्यालयातील बेलिफ व लिपिक गट-क स्पर्धा परीक्षा-२०२६ रविवार, दि. ६ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्हा केंद्रावर घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १४ शाळा व महाविद्यालयांतील परीक्षा केंद्रांवर एकूण ४ हजार ७५२ उमेदवारांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी ४८७ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड यांनी दिली आहे. ही परीक्षा दोन सत्रांत होणार असून सकाळचे सत्र सकाळी ११ ते दुपारी १२ आणि दुपारचे सत्र दुपारी ३ ते ४ या वेळेत होईल.

**परीक्षा केंद्र व परीक्षार्थी संख्या याप्रमाणे–**

१) मौलाना आझाद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, रोझाबाग, हर्सूल रोड (विज्ञान इमारत), भाग-अ – ३१२.

२) मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, रोझाबाग, हरसूल रोड (टॉम पॅट्रिक बिल्डिंग), भाग-ब – ४८०.

३) श्रीमती वेणूताई चव्हाण कन्या प्रशाला, एन-८, सिडको – ३१२.

४) गोदावरी पब्लिक स्कूल (माध्यमिक), विवेकानंद नगर, एन-१२, हडको – २८८.

५) बळीराम पाटील हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सिडको, एन-९, एम-२ – ३१२.

६) एम.जी.एम. जवाहरलाल नेहरू इंजिनीअरिंग कॉलेज, एन-६, सिडको – ४८०.

७) एम.जी.एम. संस्कार विद्यालय, एन-६, सिडको, मध्य नाका – २४०.

८) डॉ. रफीक झकारिया कॉलेज फॉर वुमेन, नवखंडा, जुबली पार्क – ४३२.

९) मिलिंद कॉलेज ऑफ सायन्स, नागसेन वन – ३१२.

१०) सरस्वती भुवन बॉईज स्कूल, औरंगपुरा – ४३२.

११) ए.के. वाघमारे प्रशाला, सरस्वती नगर, औरंगपुरा – २८८.

१२) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा – २८८.

१३) शासकीय तंत्रनिकेतन (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक), उस्मानपुरा – ३१२.

१४) शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय, सुभेदारी गेस्ट हाऊसजवळ, विश्वास नगर – २६४.

**परीक्षार्थींसाठी सुचना** : सुधारित कार्यपद्धतीनुसार प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्राचे मुख्य प्रवेशद्वार बंद करण्यात येणार आहे. निर्धारित वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी वेळेपूर्वी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

परीक्षेला येताना उमेदवारांनी ओळखीच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारातील वाहनचालक परवाना यापैकी किमान एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

परीक्षा कक्षात प्रवेशपत्र, काळ्या किंवा निळ्या शाईचे बॉलपॉइंट पेन, मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत याव्यतिरिक्त अन्य कोणतेही साहित्य नेण्यास परवानगी असणार नाही.

डिजिटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल फोन, ब्लूटूथ, कॅमेरा फोन किंवा तत्सम संदेशवहन उपकरण तसेच कोणतेही इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षा केंद्रात नेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर स्वतःच्या जबाबदारीवर ठेवावे लागेल. या साहित्याची जबाबदारी आयोग अथवा परीक्षा केंद्राची राहणार नाही.

प्रतिबंधित साहित्य परीक्षा केंद्राच्या आवारात आणल्याचे आढळल्यास संबंधित उमेदवारावर नियमानुसार फौजदारी व प्रशासकीय कारवाईसह आयोगाच्या आगामी परीक्षांना बंदी घालण्याची कारवाई होऊ शकते.

परीक्षेच्या पर्यवेक्षणासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अधिकारी उपस्थित राहणार असून जिल्हाधिकारी स्वतः परीक्षा व्यवस्थेच्या पर्यवेक्षणावर लक्ष ठेवणार आहेत.

सर्व उमेदवारांनी आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या सर्व उमेदवारांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड यांनी कळिवले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मराठवाड्यातील क्रीडा संकुले आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी पाठपुरावा करा-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

## दर सोमवारी क्रीडा संकुल परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच ऑलिम्पिकसारख्या प्रतिष्ठच्या स्पर्धांसाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने विभागातील सर्व विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुले आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि उच्च दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज करावीत. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन सर्वंकष विकास आराखडा तयार करून त्याचा नियमित पाठपुरावा करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. क्रीडा संकुलांच्या विकासासाठी येणाऱ्या अडचणींचे विभागीय पातळीवर तातडीने निराकरण करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयातील त्यांच्या दालनात मराठवाड्यातील विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुलांचे अद्ययावतीकरण, क्रीडा संकुलांसाठी आवश्यक असलेली जमीन, उपलब्ध निधीचा विनियोग आणि अतिरिक्त निधीची मागणी याबाबत विभागातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजीनगर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक शेखर पाटील, लातूर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक मिलिंद दीक्षित, जालना जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, बीडचे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, धाराशिवच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर, नांदेडचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, लातूरचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंडे, परभणीचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले, हिंगोलीचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर उपस्थित होते.

जी. श्रीकांत म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्यात विविध खेळांतील उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी स्थानिक स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे नियमित आयोजन झाले पाहिजे. खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे सिंथेटिक ट्रॅक उभारण्यास प्राधान्य द्यावे. ज्या जिल्ह्यांत अद्याप सिंथेटिक ट्रॅक उपलब्ध नाही, त्यांनी सिंथेटिक ट्रॅक उभारण्यासाठी तातडीने विकास आराखडा सादर करावा. क्रीडा संकुलांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध नसलेल्या ठिकाणीही जिल्हा पातळीवर प्रस्ताव सादर करून त्याचा नियमित पाठपुरावा करावा.

तरुण पिढीला सकारात्मक दिशा देण्यासाठी आणि त्यांच्यातील खिलाडूवृत्तीला प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विविध खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची मैदाने विकसित करण्यासोबतच क्रीडा संकुलांच्या भविष्यातील विस्तारासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

क्रीडा संकुलांच्या विकासाचे नियोजन करताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर करून प्राधान्यक्रम निश्चित करावेत. आधुनिक बाबींचा समावेश असलेला उच्च दर्जाचा आराखडा वास्तुविशारदांकडून तयार करून आवश्यक निधीसाठी येत्या दहा दिवसांत प्रस्ताव सादर करावेत. प्रस्तावित निधी विविध स्रोतांतून लवकर उपलब्ध होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित पाठपुरावा करावा. यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागाच्या विभागीय क्रीडा उपसंचालकांनी विभागीय स्तरावर समन्वय साधावा. निधी उपलब्धतेबाबत अडचणी आल्यास त्या सोडविण्यासाठी स्वतः प्रयत्न करणार असल्याचेही विभागीय आयुक्तांनी सांगितले.

सध्या प्रगतिपथावर असलेल्या क्रीडा संकुलांच्या कामांची ड्रोनद्वारे पाहणी करून कामांची छायाचित्रे व व्हिडिओ संकलित करावेत आणि त्याआधारे प्रगती अहवाल वेळेत सादर करावा. क्रीडा संकुलांची कामे गुणवत्तापूर्णच झाली पाहिजेत, याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नियमितपणे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून विजेते व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्रे व पारितोषिके देण्यात यावीत. क्रीडा संकुलांमध्ये आधुनिक सुविधांसोबत स्वच्छतागृहेही अत्यंत स्वच्छ व सुस्थितीत ठेवावीत. स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता कायम राहण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून त्यांना योग्य मानधन मिळत आहे की नाही, याची खातरजमा जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी स्वतः करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर सोमवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुल परिसरातही दर सोमवारी सकाळी १० ते ११ या कालावधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी या उपक्रमात स्वतः सक्रिय सहभाग घ्यावा. नियमित स्वच्छता मोहिमेमुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये स्वच्छतेची संस्कृती रुजण्यासोबतच क्रीडा संकुल परिसर स्वच्छ व सुस्थितीत राखण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

क्रीडा संकुलाच्या इमारती व परिसराची नियमित देखभाल, दुरुस्ती आणि निगा राखणे आवश्यक आहे. परिसरातील हिरवळ कायम ठेवण्यासाठी विविध स्रोतांमधून पाणी उपलब्ध करून घेण्यासोबतच आवश्यकतेनुसार क्रीडा संकुलांमध्ये स्वतंत्र पाणीशुद्धीकरण केंद्र उभारण्याची सूचनाही त्यांनी केली.

क्रीडा संकुलात प्रवेश करताच परिसर उत्साही, चैतन्यपूर्ण आणि सकारात्मक वातावरणाने युक्त दिसला पाहिजे. मराठवाड्यातून उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सर्व संबंधितांचा सहभाग व समन्वय आवश्यक असल्याचे विभागीय आयुक्तांनी नमूद केले.

बैठकीत छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील तालुकानिहाय क्रीडा संकुलांची सद्यस्थिती, अद्ययावतीकरणाची कामे, उपलब्ध सेवा-सुविधा आणि प्रस्तावित कामांची माहिती सादर केली. तसेच क्रीडा संकुलांच्या विकासासंदर्भातील अडचणी व आवश्यक उपाययोजनांबाबत मते मांडली. विभागस्तरावरील बैठक यापुढेही नियमित होणार असून यासाठी छत्रपती संभाजीनगर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक श्री. पाटील हे समन्वयक म्हणून काम बघणार आहेत.

# सुरळीत वीजपुरवठ्यासह थकबाकी वसुलीकडे लक्ष द्या; महावितरणचे संचालक सचिन तालेवार यांचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर तसेच लातूर परिमंडलात ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासह वीजबिल थकबाकी वसुलीसाठी गांभीर्याने प्रयत्न करा, असे निर्देश महावितरणचे संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांनी दिले. यावेळी दोन्ही परिमंडलांत सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेऊन ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर तसेच लातूर परिमंडलातील अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांची तालेवार यांनी शुक्रवारी (४ सप्टेंबर) मंडल व विभागनिहाय आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस मुख्य अभियंता दीपक कुमठेकर व अरविंद बुलबुले यांची उपस्थिती होती.

संचालक तालेवार म्हणाले की, ग्राहकांना गतिमान सेवा व सुरळीत विद्युतपुरवठा करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. त्याबरोबरच वापरलेल्या विजेच्या प्रत्येक युनिटची वसुली झालीच पाहिजे. महावितरण ही सेवा देणारी सार्वजनिक सेवा कंपनी आहे. ग्राहकांना आपण जी वीज देतो, ती आपल्याला वीजनिर्मिती कंपन्यांकडून रोख खरेदी करावी लागते. त्यामुळे वीजबिलांचा ग्राहकांनी नियमित भरणा करावा, यावर कर्मचाऱ्यांनी भर दिला पाहिजे. जे ग्राहक वीजबिलांचा भरणा करण्यास दाद देत नाहीत, त्यांचा विद्युतपुरवठा नियमानुसार खंडित झालाच पाहिजे, अशा सक्त सूचना तालेवार यांनी दिल्या. दोन्ही परिमंडलात वीजबिलांची थकबाकी वाढत आहे. परंतु अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून वसुलीसाठी व्यापक प्रयत्न होताना दिसत नाहीत. अनेक ग्राहक वर्षानुवर्षे बिल न भरता वीज वापरत आहेत. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे अधिक काळ बिल न भरणाऱ्या प्रत्येक ग्राहकाचे वीजबिल वसुल झाले पाहिजे अथवा नियमानुसार वीजपुरवठा खंडित झाला पाहिजे. वीजपुरवठा खंडित केल्यानंतरही काही ग्राहक अनधिकृतपणे वीज वापरतात का याची पडताळणी करावी. पडताळणीत वीजचोरी करताना ग्राहक आढळले तर त्यांच्यावर विद्युत कायद्यानुसार कारवाई करावी, असे निर्देश तालेवार यांनी दिले. संचालक तालेवार यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, वाहिनी विलगीकरण योजना, वीजगळती कमी करणे या योजनांचाही संबंधित कंत्राटदारांच्या प्रतिनिधींसोबत स्वतंत्र आढावा घेतला. शासनाच्या या लोकोपयोगी योजनांची कामे दर्जेदार पद्धतीने करा. आपल्या कार्यक्षेत्रातील लोकप्रतिनिधींना कामांची नियमित माहिती द्या. सर्व योजनांच्या भौतिक व वित्तीय प्रगतीला वेग द्या, असे निर्देश त्यांनी दिले.

# सलग दुसऱ्या दिवशी महानगरपालिकेची जप्ती कार्यवाही; एकवीस दुकाने सील



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- मनपा आयुक्त श्री अमोल येडगे यांनी मालमत्ता धारकांना थकित कर भरून अप्रीय कार्यवाही टाळावी असे आवाहन करीत थकबाकीदार मालमत्तांवर जप्तीची कार्यवाही करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर आज दिनांक ०४.०९.२०२६ रोजी अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त (कर निर्धारक व संकलक) श्री विकास नवाळे यांनी सर्व झोन कार्यालयातील कर वसूली पथकांना थकबाकीदारांच्या याद्या देउन कार्यवाही करण्याच्या सुचना केल्या. त्यानुसार आज झोन ८ कार्यालयातर्फे सर्वाधीक १२ व्यावसायीक थकबाकीदार दुकानांना सील लावण्यात आले.

झोन १ मधे दोन मालमत्ता सील करून १.४२ लाख तर झोन ५ मधे १ मालमत्ता सील करून ८.१७ लाख एवढा कर वसूल करण्यात आला आहे. झोन ६ च्या पथकाने २ मालमत्ता सील केल्या तर झोन ७ च्या पथकाने ३ मालमत्ता सील केल्या व एका मालमत्तेचे १.६३ लाख रुपये वसूल केले. झोन ९ मधे एक मालमत्ता सील करून रु. २ लाख तर झोन १० मधे ३ मालमत्ता मालमत्तांकडून रु.१.७० लाख वसूल केले. सगळ्यात मोठी कारवाई झोन ८ तर्फे करण्यात आली. याठिकाणी सहाय्यक आयुक्त झोन ८ श्री भारत बिरारे यांच्या पथकाने आमदार रोड व सातारा परिसरातील बारा दुकाने कर थकित असल्याने सील केली. मालमत्ताकराची रक्कम पुर्ण भरणा केल्याशिवाय मालमत्तेचे सील उघडण्यात येणार नसल्याचे मनपा आयुक्त श्री अमोल येडगे यांनी स्पष्ट केले तसेच मालमत्ता धारकांनी त्वरीत थकित कर भरून जप्तीची कार्यवाही टाळावी असे आवाहनही त्यांनी केले.

# दहीहंडी उत्सवासाठी शहरातील वाहतूकीत बदल

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- शहरात ५ सप्टेंबर रोजी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौक आणि रस्त्यांवर वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. दुपारी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत काही प्रमुख मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची अधिसूचना पोलीस आयुक्तालयाने जारी केली आहे.

क्रांतीचौक, गुलमंडी, कॅनॉट प्लेस, अविष्कार चौक, बजरंग चौक, टी.व्ही. सेंटर चौक, गजानन महाराज मंदिर चौक तसेच शहरातील विविध ठिकाणी दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिक आणि विविध गोविंदा पथके सहभागी होणार असल्याने वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे.

नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतुकीचे नियमन करण्याच्या उद्देशाने पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा आणि मोटार वाहन कायद्यान्वये वाहतूक निर्बंध लागू केले आहेत.

**हे प्रमुख मार्ग राहणार बंद**

क्रांतीचौक ते सिल्लेखाना चौक

गुलमंडी परिसरातील पैठणगेट, औरंगाबाद बुक डेपो, बाराभाई ताजिया चौक, सिटीचौक व औरंगपुरा पोलीस चौकीकडून येणारे मार्ग

कॅनॉट प्लेस परिसरातील एचडीएफसी बँक एटीएम चौक, बॉम्बे स्टेशनरी, फोर्ड शो-रूम परिसर व सिडको कार्यालयाकडील मार्ग

चिश्तिया चौक ते हिंदुराष्ट्र चौक परिसर

टी.व्ही. सेंटर चौक परिसरातील साक्षी मंगल कार्यालय, हडको कॉर्नर, जिजाऊ चौक आणि आयपी मेसकडून येणारे मार्ग

गजानन महाराज मंदिर चौकाकडे येणारे पटीयाला बँक, जवाहरनगर पोलीस स्टेशन, त्रिमूर्ती चौक आणि सेव्हनहिल उड्डाणपुलाकडील मार्ग

वाहनचालकांसाठी पोलिसांनी विविध पर्यायी मार्गांची व्यवस्था केली असून, संबंधितांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, परिस्थितीनुसार बंदोबस्तावरील अधिकारी आवश्यकतेनुसार वाहतूक वळवू शकतात किंवा मार्गात बदल करू शकतात.

पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना हे निर्बंध लागू राहणार नाहीत. अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायदा, महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच अन्य फौजदारी कायद्यांनुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दहीहंडी उत्सवासाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांनी वाहतूक बदल लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे आणि गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## चिकलठाणा सब पोस्ट ऑफिससाठी भाडेतत्त्वावर जागेची आवश्यकता; सोमवारपर्यंत प्रस्ताव मागविले

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- चिकलठाणा सब पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी चिकलठाणा परिसरात अंदाजे ८५० ते ९०० चौरस फूट क्षेत्रफळाची सुस्थितीतील इमारत पाच वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर घेणे प्रस्तावित आहे. इच्छुक इमारत मालकांनी आवश्यक कागदपत्रांसह सोमवार, दि. ७ सप्टेंबरपर्यंत लेखी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन वरिष्ठ डाक अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी केले आहे.

इमारतीमध्ये स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वतंत्र वीज मीटर तसेच पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. इच्छुक इमारत मालकांनी प्रस्तावासोबत मालमत्ता पत्र अथवा ८-अ नमुना, मंजूर नकाशा, अद्ययावत मालमत्ता कर पावती तसेच अन्य संबंधित कागदपत्रे जोडावीत. संपूर्ण प्रस्ताव वरिष्ठ डाक अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर हेड पोस्ट ऑफिस बिल्डिंग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ या पत्त्यावर दि. ७ सप्टेंबरपर्यंत सादर करावा, असे डाक विभागाने कळविले आहे.

## मनपाच्या १२ शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने यंदा मनपा शाळांमधील १२ शिक्षकांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये मराठी माध्यमातील १०, तर उर्दू माध्यमातील दोन शिक्षकांचा समावेश आहे.

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये एकूण ३९८ शिक्षक कार्यरत असून, पुरस्कारासाठी शिक्षकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून १२ शिक्षकांची निवड केली.

मराठी माध्यम : मनोज अग्रवाल, तेजस्विनी देसले, नंदा गटकळ, योगेश वैष्णव, किरण तबडे, सविता भांबर्डे, नीता चव्हाण, उमा पाटील, विद्युलता गोरे आणि कल्पना पाटील. उर्दू माध्यम : अर्शद सिद्दीकी आणि शमीम बेगम. दरम्यान, १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महापौर समीर राजूरकर, पदाधिकारी आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते या शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

## विभागीय आयुक्त कार्यालयात 'कर्मचारी समाधान शिबिर' संपन्न; शिबिरात एकूण १४ तक्रार अर्ज दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयात 'कर्मचारी समाधान शिबिर' पार पडले. या शिबिरात एकूण १४ तक्रार अर्ज दाखल झाले. शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक समस्यांचे संबंधित विभागांनी तातडीने निराकरण करावे आणि आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

विभागीय आयुक्तांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या शिबिरात महसूल शाखेशी संबंधित ११, नगर परिषदेशी संबंधित ०१, विकास आस्थापनेशी संबंधित ०१ आणि नियोजन शाखेशी संबंधित ०१, असे एकूण १४ तक्रार अर्ज दाखल झाले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या पुढाकाराने संपूर्ण विभागात दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत आजचे शिबिर आयोजित करण्यात आले. विविध विभागांतील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी आपल्या तक्रारी मांडल्या. या शिबिराच्या माध्यमातून त्यांच्या समस्यांची तात्काळ दखल घेऊन संबंधित प्रकरणांवर योग्य ती कार्यवाही करण्यात आली.

(पान १ वरुन)

## जिवंत राहिलो तर रविवारी...

सुपारी घेऊन खून करायच्या. तो त्यांचा रोजगार होता म्हणून सरकारने त्यांना खून करू द्यायचे का? हाताने ओढायच्या रिक्षा, टांगे किंवा मानवी विष्ठा उचलण्याची अनिष्ट प्रथा कायद्याने बंद झाली, तेव्हाही रोजगार बुडत होता. ज्या व्यवसायामुळे लाखो नागरिकांना मानसिक आणि शारीरिक त्रास होतो, तो व्यवसाय कायदेशीर किंवा तार्किकदृष्ट्या चालू ठेवताच येत नाही." "ज्याप्रमाणे बेडकाला थंड पाण्यात टाकून हळूहळू पाणी उकळले जाते, तसा हा सॉफ्ट व्हायलन्स आहे. उत्सवाच्या नावाखाली निर्माण झालेली ही दहशत सहन करण्यापलीकडे गेली आहे. तुम्हाला गाणी किंवा वाद्ये वाजवायची असतील तर ती बंदिस्त प्रेक्षागृहात वाजवा, सार्वजनिक रस्त्यांवर नागरिकांना वेठीस का धरता?" असा सवाल त्यांनी केला.

## मराठवाड्यात दुष्काळाचे सावट...

प्रश्न उपस्थित करत सरकारपर्यंत आपल्या व्यथा पोहोचवाव्यात अशी मागणी केली.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. १७ सप्टेंबर, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करून स्वतंत्र दुष्काळी पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली आहे. जनावरांसाठी तातडीने चारा आणि पाण्याची व्यवस्था करावी, तसेच शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा मिळावा, अशीही त्यांनी मागणी केली आहे.

## नावाचा दुरुपयोग करणाऱ्यांचा...

बरेचजण आहेत. त्यांचा समाचार आपण घेत चाललेलो आहोतच. आता त्याचा निकाल देखील लवकरच लागेल अशी आपल्याला खात्री आहे", अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी या संदर्भात बोलताना दिली आहे.

"तुम्ही सर्व बीड विधानसभा मतदार संघामधून आलेला आहात. तुम्ही सर्व एका मतदारसंघामधून बीएलए या ठिकाणी आलेला आहात. त्यामुळे तुमच्या सर्वांचं कौतुक आहे. बीड म्हटल्यानंतर आधी आपली आणि भाजपाची युती होती, खरं तर तेव्हाची ही युती फार वेगळी होती. आता सारखं तेव्हा नव्हतं. त्यामुळे तेव्हा त्यांच्या प्रेमाखातर बीड जिल्ह्यातील बऱ्याच जागा आपण भाजपाला सोडल्या होत्या. त्याचा परिणाम असा झाला की त्यामुळे बीडमधील आपलं अस्तित्व हळहळू कमी होत गेलं. मात्र, आता पुन्हा एकदा बीड जिल्हा भगवा करण्याची संधी आपल्याला आली आहे", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## भारताने रशियाकडून तेल खरेदी...

बंद करणं हा युद्ध समाप्तीसाठीचा उपाय नसून चर्चा आणि त्यातून निघणारा राजनैतिक तोडगा हाच युद्ध समाप्तीसाठीचा उपाय असल्याचं नमूद केलं. या दोन्ही देशांमध्ये चालू असलेलं युद्ध समाप्त करण्यासाठी भारत शक्य त्या सर्व मार्गांनी मदत करायला तयार आहे, असंदेखील जयशंकर यांनी यावेळी स्पष्ट केलं. युक्रेनचे परराष्ट्रमंत्री अँड्री सैबिहा यांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना एस. जयशंकर यांनी भारताची भूमिका मांडली. "कुणीतरी तेलखरेदी करतंय किंवा नाही करत यामुळे हे युद्ध थांबणार नाही. आता हे युद्ध सुरू होऊन चार वर्षं झाली. हा संघर्ष फक्त चर्चा, संवाद, डिप्लोमसी आणि तडजोडी यातूनच मिटवला जाऊ शकतो. त्यामुळेच भारताकडून कायमच या प्रक्रियेला प्रोत्साहन दिलं जाईल", असं जयशंकर यावेळी म्हणाले.

## कार्यालय नगर परिषद वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी क्र. ०२४३६-२९५०३६ / Email ID : npvaijapur@gmail.com

जा.क्र. नपवै/कावि-वाव्यवि/२०२६/९८२

दि. ०४/०९/२०२६

### जाहीर फेर लिलाव सूचना

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वैजापूर नगरपरिषद मालकीच्या १५ वर्षे पेक्षा अधिक जुनी झालेल्या व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे कडील अहवालानुसार वाहनांचा व नगरपरिषद मालकीच्या बांबूच्या झाडांचा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९२-अ अन्वये खालील तपशिलातील जंगम मालमत्तेची जाहीर लिलावाने 'जशी आहे तशी व जेथे आहे तेथे' या तत्त्वावर विक्री करण्याचे ठरविले आहे. तरी ज्या इच्छुकांना लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी लिलावाच्या दिवशी व ठिकाणी खालीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

**जाहीर लिलावाचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | लिलावाचा तपशील | अनामत रक्कम | मुदत |
|---|---|---|---|
| १. | नगरपरिषद वैजापूर यांचे मालकीची जलशुद्धीकरण केंद्र येथील बांबूच्या झाडांचा जाहीर लिलाव पद्धतीने विक्री करणे. | १००० | १५ दिवस |
| २. | नगरपरिषद वैजापूर यांचे मालकीची १५ वर्षे पेक्षा अधिक जुनी झालेली वाहनांचा जाहीर लिलाव पद्धतीने विक्री करणे. | ५००० | १५ दिवस |
| **लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण** शुक्रवार, दिनांक ०४/०९/२०२६ रोजी सकाळी १२.०० वा. नगरपरिषद वैजापूर यांचे जलशुद्धीकरण केंद्र, येवला रोड | | | |

**अटी व शर्ती:**

१. लिलावात भाग घेण्यासाठी वरील तत्त्यात नमूद केल्यानुसार अनामत रक्कमेचा भरणा करणे व भरणा पावती दाखविणे आवश्यक आहे.
२. लिलावाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत वैजापूर नगर परिषद कार्यालयात पहावयास मिळतील.
३. लिलावात विक्री करावयाची वाहने व बांबूची झाडे पूर्वनियोजित वेळ घेऊन पाहता येईल.
४. लिलावातील बोली कायम करणे अथवा कोणतेही कारण न देता लिलाव विक्री रद्द किंवा तहकूब करण्या साम्बबंधिचे अधिकार मुख्याधिकारी, वैजापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवले आहेत.
५. संपर्क : वैजापूर नगरपरिषद कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत.

-स्वा-
(जे. एस. थोरात)
विभाग प्रमुख,
वाहन विभाग नगर परिषद वैजापूर

स्वा-
बी.यु.बिधोत (राजपूत)
मुख्याधिकारी (गट-अ, निवडश्रेणी)
नगर परिषद वैजापूर

स्वा-
(डॉ. दिनेश पी. परदेशी)
नगराध्यक्ष
नगर परिषद वैजापूर